डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## कृषि तंत्र विद्यालय, लांजा, जि. रत्नागिरी

जा.क्र./कृतंविला/ रोपवाटीका /४४४/२०२३ दिनांक:— २९/०८/२०२३

### —: जाहीर नोटीस :—

कृषि तंत्र विद्यालय, लांजा यांजकडून या विद्यालयाच्या रोपवाटीकेतील खालील नमुद केलेली शेती विषयक कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके सोबतच्या प्रपत्रामध्ये मागविणेत येत आहेत. दरपत्रके दि. ०७/०९/२०२३ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत स्वीकारली जातील.

| अ. क्र. | विभाग | कामाची यादी | कालावधी | अंदाजे लागणारे मजुर युनिट |
|---|---|---|---|---|
| १ | रोपवाटीका | कलमे/रोपांना पाणी देणे, कलमा/रोपांमधील फूट काढणे, कलमा/रोपातील तण काढणे, गवत काढणे, कलमा/रोपांना खताची मात्रा देणे, औषध फवारणी करणे, खतेमिश्रीत माती भरुन वाहतूक करुन शेडमधे लावणे व इतर अनुषांगिक कामे करणे. | ०१/०९/२०२३ ते ३०/०९/२०२३ | १०० |
| २ | रोपवाटीका | आंबा कलमे चरामध्ये ठेवणेसाठी चर काढणे, काजू बडस्टीकसाठी डेफोलेशन करणे, बडस्टीक काढणे, रोपवाटीकेतील देखभाल व इतर अनुषांगिक कामे करणे. | ०१/१०/२०२३ ते ३१/१०/२०२३ | १०० |
| ३ | रोपवाटीका | कलमा रोपांना पाणी घालणे, कलमा रोपांवरील फूट काढणे, कुंपण दुरुस्ती करणे, कलमा रोपांतील तण काढणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | ०१/११/२०२३ ते ३०/११/२०२३ | १०० |

कामासंबंधी अटी व शर्ती सोबत दिलेल्या आहेत.

अधिक्षक,
कृषि तंत्र विद्यालय,
लांजा जि. रत्नागिरी

प्रत प्रसिध्दीसाठी रवाना :—
१प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली

/— सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही विनंती.
२कार्यालय नोटीस बोर्ड

**दरपत्रके सादर करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती :—**

१. दिलेली कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करावयाची आहेत. ( सका. ०८ ते १२.३० व दुपारी ०२.०० ते ०५. ३०)
२. दरपत्रकात **प्रती मजूर प्रती दिवस** या प्रमाणे मजूरीचा दर नमूद करावा.
३. ठेका कामासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावणेत आल्या आहेत अधिक माहितीसाठी श्री. आर. जी. कदम. (कनिष्ठ संशोधन सहायक) यांचेशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. (सका. ०८ ते १२.३० व दुपारी ०२.०० ते ०५. ३०)
४. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.
५. ठेकेदारांच्या कामगारांचे अपघात विमा असणे आवश्यक आहे.
६. ठेकेदारांच्या कामगारांना काम करताना इजा अथवा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ठेकेदारांची राहिल.
७. कामासाठी लागणारी साधने व हत्यारे ठेकेदारांनी पुरवावयाची आहे.
८. शासनाने निर्गमित केलेले आयकर व तत्सम कर बिलामधून परस्पर वजा केले जातील.
९. काम समाधानकारक न आढळल्यास अथवा कामामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्ष व्यत्यय आणल्यास ठेका रद्द करण्यात येईल.
१०. सदर कामे ही केवळ कंत्राटी पध्दतीने करावयाची असल्याने कोणत्याही व्यक्तीस विद्यापीठाच्या सेवेत घेण्याचा हक्क असणार नाही.
११. ठेक्यावरील कंत्राटी मजूर यांचा पोष्टाचा प्रतिवर्ष/प्रतिव्यक्ती रूपये ४००/— विमा काढण्यात येईल.